**राष्ट्रीय सेवा योजना वृक्षारोपण** कार्यक्रम

# 11 जुलै 2018

राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त ट्रिनिटी अकॅडमी अभियांत्रिकी महाविदयालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वयंसेवकांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला होता. या कार्यक्रमात महाविदयालयाच्या परिसरात 140 झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात वृक्षपूजनाने झाली. या दरम्यान मा.प्राचार्य,प्राध्यापक वर्ग तसेच विदयार्थ्यांनी देखील आपल्या भाषणातून वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले. त्याच वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.सचिन कुदळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास,योजनेची उद्दिष्टे तसेच योजनेचे स्वरूप समजावून सांगितले. या दरम्यान गणेश जाधव या विदयार्थ्याला पाउस पाडण्यासाठी वृक्षारोपण कसे महत्वाचे आहे, त्याचे शास्त्रीय कारण सांगितले.

तृतीय व चतुर्थ वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विदयार्थ्यांनी सदरील वृक्षांची देखभाल करण्याचा संकल्प केला. वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांबरोबरच इतर विदयार्थ्यांचा देखील उत्स्फुर्त प्रतिसाद होता. या कार्यक्रमाच्या वेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. **निलेश उके**,स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.सतिश देशमुख सर यांची उपस्थिती लाभली.